# सुदृढ लोकशाहीसाठी स्थिर सरकारप्रमाणेच मजबूत विरोधी पक्षाचीही आवश्यकता

**डॉ.आण्णासाहेब हरदारे** राज्यशास्त्र विभाग सहाय्यक प्राध्यापक शिवराज कॉलेज,गडहिंग्लज .

---

**प्रस्तावना :** सुदृढ लोकशाहीसाठी स्थिर सरकारप्रमाणेच मजबूत विरोधी पक्षाचीही आवश्यकता असते. विरोधी पक्ष सरकारच्या कामकाजावर, धोरणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करून त्यांच्या मनमानी कारभारावर नियंत्रण ठेवू शकतो. संसदेमध्ये विरोधकांचा आवाज क्षीण असेल तर सरकार मनमानी पद्धतीनं कायदे बनवू शकते. विरोध पक्ष मजबूत नसेल तर सभागृहात कोणत्याही विषयावर सखोल चर्चाही होऊ शकत नाही. संसदेच्या कामकाजात विरोधी पक्षनेता हे पद सर्व विरोधी गटाचे पक्षाचं प्रतिनिधित्व करणारे असते. ते सरकारला प्रतिप्रश्न विचारणारे, लोकांच्या समस्यांसाठी, धोरणांवर अंकुश ठेवणारे, त्यांची निराकरण करणारे, थेट सरकार दरबार मध्ये दाद मागणारे असते. सत्तारूढ़ सरकार कोणत्याही कारणाने म्हणजे पुरेसं संख्याबळ नसताना बहुमत सिद्ध करण्यात अयशस्वी झाल्यास अर्थात कोसळल्यास देशाची सूत्रे म्हणजेच मंत्रिमंडळाची सूत्रे घेण्यासाठी विरोधी पक्षनेत्याने तयारीत असते म्हणून विरोधी पक्षांना पर्यायी सरकार म्हणूनही मानले जाते .

- **संशोधनाचा उद्देश** : सदर संशोधनाचा उद्देश पुढील प्रमाणे

१. विरोधी पक्ष म्हणजे काय अभ्यासणे.

२. भारतातील लोकशाहीच्या वाटचालीत विरोधी पक्षाची भूमिका अभ्यासणे.

३. सद्यकालीन विरोधी पक्षाचे अस्तित्व आणि भूमिका अभ्यासणे.

- **संशोधन पद्धती** : सदर संसोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर केला असून त्यामध्ये प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा वापर केला आहे.
- **संसोधनाची गृहीतके** : १. संसदीय लोकशाही शासन पद्धतीत विरोधी पक्षाची भूमिका महत्त्वाची आसते.

२.भारतातील लोकशाहीच्या वाटचालीत विरोधी पक्षाची भूमिका महत्त्वाची राहिली आहे.

३. विरोधी पक्ष जनतेचा आवाज आसतो.

- **संसोधनाची व्याप्ती :** प्रस्तुत शोधनिबंध क्षेत्र भारतीय संसदीय लोकशाही व्यवस्था मधील लोकसभा या सभागृहाचा आहे .
- **विरोधी पक्ष संविधानिक तरतूद :** आपल्या देशात लोकशाही राज्यव्यवस्था आहे. त्यामुळे बहूपक्ष पध्दतीची संसदीय लोकशाही अस्तित्वात आहे. लोकशाहीमध्ये दोन महत्त्वाचे पक्ष असतात. बहुमताच्या जोरावर निवडून आलेला तो सत्ताधारी पक्ष आणि दुसरा विरोधी पक्ष, ज्या पक्षांकडे आवश्यक ते संख्याबळ असत नाही अर्थात लोकशाही समाजव्यवस्था ही विरोधी पक्षांवर अवलंबून असते. म्हणून विरोधी पक्ष लोकशाहीच्या रक्षणासाठी महत्त्वाचा असतो. भारताच्या संसदीय परंपरेत विरोधी पक्ष नेते पद हे वैधानिक मानलं जातं . 1919 च्या कायद्यानुसार ब्रिटिश भारतात केंद्रीय विधिमंडळामध्ये श्री.मोतीलाल नेहरू यांनी विरोधी पक्षनेता म्हणून काम केले होते .त्यानंतर भारताचे पाहिले लोकसभा सभापती श्री. जी.व्ही. मालवणकर यांनी सांसदीय शासन पद्धतीच्या संकेतानुसार विरोधी पक्ष आणि विरोधी पक्ष नेता निवड करताना पुढील आटी भारतीय सांसदीय लोकशाही विकसीत करण्याचा प्रयत्न केला. त्यानीं स्पष्ट केले होते की विरोधी पक्ष म्हणून त्याची एक वेगळी विचारधारा आणि कार्यक्रम असेल .निवडणूक पूर्वी जाहीर केलेल्या विचारधारा वर त्यानी सभागृहात एकसंघ राहिले पाहिजे .त्यांचा देशासमोरील सर्व महत्वाच्या मुद्द्यावर जनतेच्या मतांशी संपर्कात असले पाहिजे तसेच त्यांनची संख्या सभागृहाचे कामकाज चालवण्यासाठी निश्चित केलेल्या कोरम पेक्षा कमी नसावी .म्हणजेच एकूण सदस्य संख्येच्या एक दशांश आहे.1952 ते 1969 प्रयत्न विरोधी पक्ष नेता म्हणून कोणत्याही व्यक्तीची निवड करण्यात आली नव्हती. पण चौथ्या लोकसभेत 1969 मध्ये पहिल्यादा सभागृहात डॉ.राम सुभाग शिंह यांची विरोधी पक्ष नेता म्हणून नियुक्ती करण्यात आली.Salaries and Allowances of Leaders of Opposition in Parliament Act 1977 नुसार भारताच्या संविधानाच्या कायद्यात विरोधी पक्ष आणि विरोधी पक्षनेतेपद याविषयी तरतूद करण्यात आलेली आहे या कायद्यानुसार भारताचे विधिमंडळ सभापतीला संसदेत सत्ताधारी पक्षाच्या नंतर संख्येने सर्वाधिक खासदार असलेल्या पक्षाला विरोधी पक्ष म्हणून तसेच विरोधी पक्षनेता म्हणून नियुक्त करण्याचा अधिकार आहे हीच तरतूद राज्य विधिमंडळातही आहे विरोधी पक्ष म्हणून पद मिळवण्यासाठी अक्षरात संसदेच्या किंवा राज्य विधिमंडळाच्या एकूण जागांच्या किमान दहा टक्के जागा मिळाल्या पाहिजेत . अधिनियम 19 77 नुसार लोकसभेतील विरोधी पक्षाने तीन अटी पूर्ण केल्या पाहिजेत

1.तो सभागृहाचा सदस्य असावा

2. सरकारच्या विरोधात असलेल्या पक्षाचे संख्यात्मक संख्या व सर्वाधिक असा आहे सर्वाधिक असावे

3. लोकसभेच्या अध्यक्षांच्याद्वारे त्यांची नियुक्ती केली जाईल

4. संसदेच्या अध्यक्षपदी असणाऱ्या व्यक्तीने सर्वांना मते विरोधी पक्षाची नेमणूक केली पाहिजे.

व्याख्या '**Salaries and Allowances of Leaders of Opposition in Parliament Act, 1977**' भारताच्या संविधानाच्या कायद्यात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. या कायद्यानुसार भारताचे लोकसभा सभापती, संसदेत संख्येने सर्वाधिक खासदार असलेल्या विरोधी पक्षाच्या नेत्याला हीच तरतूद राज्य विधिमंडळातही विरोधी पक्षनेता म्हणून मान्यता देतो. विरोधी पक्ष म्हणून पद मिळविण्यासाठी, पक्षाला संसदेत एकूण जागांच्या किमान 10% जागा मिळाल्या पाहिजेत. हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की या संदर्भात एका पक्षाने नव्हे तर आघाडीने 10% जागांचे निकष पूर्ण केले पाहिजेत. भारतातील अनेक राज्य विधानमंडळे देखील 10% नियमानुसार जातात तर उर्वरित एकल सर्वात मोठ्या पक्षाला त्यांच्या संबंधित नियमांनुसार विरोधी भूमिका बजावण्यास प्राधान्य देतात.

- **विरोधी पक्षाची आयुधे :**

लोकसभेचे पहिले सभापती श्रीमान जी व्ही मावळंकर यांनी तयार केलेल्या आणि तेव्हापासून पाळलेल्या नियमांनुसार, संसदीय पक्ष आणि पक्षाचा नेता म्हणून नियुक्त होण्यासाठी पक्षाकडे सभागृहाचे किमान दहा टक्के संख्याबळ असणे आवश्यक आहे. विरोधी पक्षातील सर्वात मोठा संसदीय पक्ष हा विरोधी पक्षाचा नेता म्हणून नियुक्त केला जातो. लोकसभेत संसदीय पक्ष स्थापन करण्याचा प्रस्ताव देणाऱ्या सदस्यांच्या संघटनेसाठी मावळंकरांनी घातलेल्या अटी पुढीलप्रमाणे आहेत: त्यांची एक वेगळी विचारधारा आणि कार्यक्रम असणे आवश्यक आहे जे त्यांनी निवडणुकीपूर्वी जाहीर केले आहे आणि ज्यावर ते निवडून आले आहेत आणि 'त्यांनी एक एकसंध एकक तयार केले पाहिजे जे चांगल्या प्रकारे विणलेल्या अस्तित्वात विकसित होण्यास सक्षम असेल'; त्यांची सभागृहाच्या आत आणि बाहेर अशी संघटना असावी, जी देशापुढील सर्व महत्त्वाच्या मुद्द्यांवर जनतेच्या मताशी संपर्कात असेल; त्यांना किमान एवढं संख्याबळ मिळायला हवं जे त्यांना सभागृह चालू ठेवता येईल, म्हणजेच त्यांची संख्या सभागृहाची बैठक बसवण्यासाठी निश्चित केलेल्या कोरमपेक्षा कमी नसावी, जी एकूण सदस्यसंख्येच्या एक दशांश आहे.

*१. लोकशाहीमध्ये विरोधी पक्ष नेता व विरोधी पक्ष खऱ्या अर्थाने पहारेकरी म्हणून भूमिका पार पाडत असतो. हा पहारेकरी ज्या प्रमाणात सजग असेल त्या प्रमाणात लोकशाही सजग व सुदृढ बनते. सभागृहात मुख्यमंत्र्यांनंतर दुसरे प्रमुख अधिकार विरोधी पक्ष नेत्याकडे असतात. सरकारच्या कार्यावर व धोरणावर टीका करण्याची प्रमुख जबाबदारी विरोधी पक्षावर असते. सरकारी धोरणाचे व कार्यक्रमाचे वाभाडे काढून ते धोरण जनतेच्या हिताच्या दृष्टीने कसे बरोबर नाही ते विरोधी पक्ष नेता निदर्शनास आणत असतो. त्यासाठी विरोधी पक्षनेता वेगवेगळ्या मार्गांचा अवलंब करीत असतो. येणाऱ्या निवडणुकीत जनमत जागृत करून आपल्या पक्षाकडे वळविण्यासाठी तो प्रयत्नशील असतो.*

*२. राष्ट्रपती अभिभाषणावर चर्चा , अर्थसंकल्प व मागण्यांवरील चर्चा व प्रश्न , तहकुबीचा ठराव मंत्रिमंडळावर अविश्वासाचा ठराव इतर ठराव , अर्धा तास चर्चा लक्षवेधी इत्याद्दी मार्गांनी सत्ताधारी पक्षावर नियंत्रण ठेवले जाते .*

*३.भारताचा महाधिवक्ता .सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश , निवडणूक आयोगाचे सदस्य वा अध्यक्ष तसेच इतर संविधानिक राजकीय व्यवस्थेच्या प्रमुखांच्या निवडीमध्ये विरोधी पक्षाचा महत्वाचा सहभाग आसतो.*

*४. विरोधीपक्ष सावली सरकार म्हणून काम करते.*

- **विरोधी पक्षाची भूमिका**

सत्ताधारी पक्ष आणि सरकार यांच्या उत्तर दायित्वची पातळी ,सार्वजनिक सेवा वितरणाची परिणामकारकता आणि देशाच्या लोकशाहीची गुणवत्ता ठरवण्यासाठी विरोधी पक्षाची भूमिका महत्वाची असते .संविधानिक तरतुदी प्रथा परंपरा आणि संकेत नुसार विरोधी पक्ष पुढील भूमिका पार पाडतो.

1. विरोधी पक्षनेता सभागृहाचा उपसभापती असतो.
2. लोकलेखा समितीचे अध्यक्ष विरोधी पक्षाचे नेते असतात.
3. संसदेच्या कामकाजासाठी निर्माण केलेल्या संसदीय समितीचे सदस्य ही विरोधी पक्षाचे असतात
4. भारताचा महाधिवक्ता सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश निवडणूक आयोगाचे सदस्य किंवा अध्यक्ष तसेच इतर संविधानिक राजकीय व्यवस्थेच्या प्रमुखांच्या निवडीमध्ये विरोधी पक्षाचा सहभाग महत्त्वाचा असतो.
5.CBI,NHRC,CVC, इत्यादी प्रमुख संस्थांच्या नियुक्तीमध्ये विरोधी पक्षाचा सहभाग महत्वाचा असतो
6. राष्ट्रपतीचे अभिभाषण अर्थसंकल्प अर्थसंकल्पातील चर्चा प्रश्न तर कृपया ठराव मंत्रिमंडळावरील अविश्वास विविध एक स्तवन प्रस्ताव सामान्य जनतेचे महत्त्वाचे प्रश्न यावरती सभागृहात लक्ष्मी दि चर्चा घडवून आणून विरोधी पक्ष सत्ताधारी पक्षावर नियंत्रण ठेवतो.
7. विरोधी पक्षांना सरकारचा खर्च तपासण्याचा अधिकार आहे
9. सत्ताधारी पक्षावर टीका करून भारतीय राज्यघटना करा एकोणिसाव्या कलमानुसार अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा सन्मान विरोधी पक्षाकडून केला जातो
10. सत्ताधारी पक्ष अपयशी ठरल्यास विरोधी पक्ष पर्यायी सरकार देऊ शकतो
11. सत्ताधारी पक्षाच्या धोरणावर आणि कार्यपद्धतीवर शाश्वत आणि तत्वनिष्ठ टीका करून सत्ताधारी पक्षावर अंकुश ठेवला जातो तसेच सत्तेचा समतोल राखण्यामध्ये विरोधी पक्षाची भूमिका महत्त्वाची असते
12. राजकीय व्यवस्थेचे लोकशाही चारित्र्य राखण्यात विरोधी पक्षाची भूमिका महत्त्वाची असते
13. विरोधी पक्ष संसदीय सभागृहातील एका पक्षाचे वर्चस्व नाकारते.
14. विधिमंडळात सरकारच्या जबाबदारीचे समर्थन आणि जाणीव करून देण्याचे काम विरोधी पक्ष करीत असतात
15. विरोधी पक्षाकडून जनतेचे खरे लोकमत विधिमंडळात मानले जाते

- **संसदीय लोकशाही मध्ये विरोधी पक्षाचे महत्त्व :**

1. संसदेतील प्राथमिक सत्तेतील बहुमताला विश्वासहार्य पर्याय उपलब्ध करून देण्याचे काम विरोधी पक्ष करीत असतो त्यामुळे विधिमंडळी सदस्यांच्या आचरणात पारदर्शकता सचोटी आणि कार्यक्षमता सुनिश्चित होते तसेच अधिकाऱ्याकडून होणारे गैरवर्तन रोखण्यासाठी आणि व्यक्तीचे संरक्षण करण्यामध्ये विरोधी पक्षाचे योगदान महत्वपूर्ण आहे
2. संसदेची पादकता टिकून ठेवण्यासाठी विरोधकाची भूमिका महत्त्वाची असते.
3. सत्ताधारी सरकार हुकूमशाही पद्धतीने वागू नये म्हणून त्यांच्या अधिकारावर मर्यादा घालण्यासाठी विरोधी पक्ष त्यांच्यावर लक्ष ठेवतात

4. सरकारच्या धोरणावर टीका करणे हे विरोधी पक्षाचे प्रमुख कार्य आहे
5. विधिमंडळाच्या बाहेर विरोधी पक्ष पत्रकारांचे लक्ष वेधून घेतात आणि वृत्तपत्रातून सरकारी धोरणावर टीका करतात

- **विरोधी पक्ष नसल्याचे परिणाम**

1.सध्या लोकसभे बरोबर 7 घटक राज्यात विरोधी पक्ष आस्तित्वात नाही
2.परिपक्व लोकशाही साठी मतभेद व विरोध आवश्यक आहे
3.सत्ताधारी पक्षची शक्ती तपासण्यासाठी विरोधी पक्ष आवश्यक आहे
4. कोणत्याही विषयावर विधिमंडळात सखोल चर्चा होत नाही
5.संसदीय समित्यांना अध्यक्ष किवा सदस्य मिळत नाही .
६.वैधानिक पदाच्या निवडीमध्ये विरोधी पक्ष सदस्य आवश्यक आसतात नाहीतर त्यंच्या निवडीवर सत्ताधारी पक्षाचे वर्चस्व राहते .
7.सत्ताधारी हुकुमशाही पद्धतीने वागतात त्यावर नियंत्रण ठेवण्याचे काम विरोधीपक्ष करित आसतात ते होत नाही.
९.विधेयके विनाचर्चा वाजवी मताने मंजूर केली जातात .

**उपाययोजना :**

1. संसदीय लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी विरोधी पक्षाची आवश्यकता असते त्यासाठी दहा टक्के सदस्य संख्येची अट न घालता विधिमंडळात सरकार नंतर येणाऱ्या संख्यात्मक दृष्ट्या जास्त असणाऱ्या पक्षाला विरोधी पक्ष म्हणून मान्यता मिळाला.
2. विरोधी पक्षाने सभागृहात सकस चर्चा करावी तसेच सरकारकडून येणाऱ्या धोरणांना सकारात्मक प्रतिसाद द्यावा.
3. विधिमंडळ हे जनतेचे प्रतिनिधित्व करणारे असते त्यामुळे पक्ष विचारसरणी यांचा विचार न करता जनतेच्या प्रश्नांना सत्ताधारी आणि विरोधी पक्षाने महत्त्व द्यावे.
4. विरोधी पक्षाने फक्त विरोधासाठी विरोध न करता सभागृहात अनाथ हे गोंधळ न घालता सकारात्मक विरोध करून सरकारला जबाबदार शासन पद्धती व कडे वळवण्याचा प्रयत्न करावा.

- **निष्कर्ष :**

1.प्राथमिक सत्तेतील बहुमताला विश्वासार्ह पर्याय उपलब्ध करून देणे हे विरोधी पक्षाचे कार्य असते.
2.सत्ताधारी सरकारवर देखरेख करून आणि सरकारच्या कृतीवर टीका करून त्यांच्या आचरणात पारदर्शकता कसोटी आणि कार्यक्षमता सुनिश्चित करणे यासाठी विरोधी पक्ष आवश्यक आहे.
3.प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या कडून होणारी गैरवर्तन रोखण्यासाठी आणि व्यक्ती किंवा द्वारे संरक्षण सुनिश्चित करून सार्वजनिक हित जपण्यामध्ये विरोधी पक्ष योगदान देतात.
4. लोकशाहीचे यश हे सत्ताधारी व विरोधी पक्ष अवलंबून असते.
5. लोकशाही यशस्वीपणे चालवण्यासाठी विरोधी पक्ष कायदेशीर असतात पाहिजे त्याला संस्थात्मक रूप दिले पाहिजे.
6. सत्ताधारी पक्ष व विरोधी पक्ष यांच्यामध्ये निरोगी स्पर्धा अपेक्षित आहे.
7. विरोधी पक्षाने सक्रिय व रचनात्मक विरोधी पक्ष ही कार्यक्षम निरोगी लोकसंख्या अर्ज उपराष्ट्र आणि पोचवण्याचा होत नाही तर धोरणावर सकारात्मक अधिकार आहे हे लक्षात घेणे अपेक्षित आहे.
8. विरोधी पक्षाने दिलेल्या स्पष्ट पर्यायामुळे देशात धोरणात्मक पर्याय देशाची दिशा आणि भविष्य यावर रचनात्मक होऊ शकते.
9. लोकशाहीची ताकद परिणाम परिणामकारकता आणि गुणवत्ता मुख्यत्वे विरोधी पक्षाच्या कार्यक्षमतेवर प्रासंगिक तेवर आणि विश्वासार्हपणे दाखवलेल्या क्षमतेवर अवलंबून असते.
10., विरोधी पक्षाचे मुख्यमंत्री सत्ताधारी सरकारला प्रश्न विचारणे आणि जनतेला जबाबदार धान्य आहे त्यामुळे सत्ताधारी पक्षाच्या चुका सुधारण्यासाठी मदत होते.
11. विरोधी पक्ष सरकारच्या लोकांचे हिताची एकरूप नसलेल्या धोरणांना विरोध करते तसेच जनतेच्या समोर आवाज उठवणारा पक्ष म्हणून ओळखला जातो.
12. भारतातील काही विरोधी पक्ष फक्त विरोधासाठी म्हणून विरोध करताना दिसून येतात.
13. विरोधी पक्ष सभागृहात गोंधळ घालून बऱ्याचदा सभागृहाचे कामकाज बंद पडताना दिसतात.

- **संदर्भ ग्रंथ सूची :**

1.Legislativebodiesinindia .nic.in . website
2.R.K.Tiwari : Political parties party manifestos and election in India .(Ed. 2020)
3.Rekha Diwakar :Party Systeem in India ( Ed.2017)
4.Suhas Palshikar : Indian Democracy .( Ed.2017)
5.Zoya Hasan ( edited book ): Parties and Party Politics In India ( Ed.2004)
5.मनीषा एम.: संसदीय परिणामकारकता आणि विरोधी पक्षाची बुमिका.2 १४वि लोकसभा निवडणुका तुलनात्मक आभ्यास (२०१० ते २०११ )